## मुर्तिजापुर येथे अल्पवयीन मुलगी बेपत्ता

■मुर्तिजापुर,दि.९ (प्रतिनिधी)■
शहर पोलिस ठाणे हद्दीतील १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना शनिवारी ७ फेब्रु.सायंकाळी उघडकीस आली आहे.

याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर मुलगी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घरातून कुणालाही काहीही न सांगता निघून गेली.

# ‘नैसर्गिक शेती– संधी आणि आव्हाने’ विषयावर राज्यस्तरीय विचारमंथन!

### डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला: नैसर्गिक शेती अभियातर्गत उपक्रम!

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
बदलत्या जगतिक परिस्थितीत भारतीय शेती शाश्वत व शेतकरी संपन्न होण्या सोबतच विषमुक्त, सकस, निर्भेळ अन्नधान्य उत्पादित होत जमिनीसह मानवी आरोग्य देखील उत्तम राहणे ही काळाची गरज हेरत भारतीय शेती व्यवसायाने अनेक स्थित्यंतरांचा स्वीकार केला आहे. त्यामधीलच अलीकडील काळात लोकप्रिय होत असलेली नैसर्गिक शेती संकल्पना आहे.

नैसर्गिक शेती ही केवळ एक शेती पद्धती नसून ती एक शाश्वत जीवनदृष्टी आहे. केंद्र शासनाच्या शाश्वत शेती धोरणांनुसार तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी धोरणांनुसार नैसर्गिक शेतीस चालना देणे ही काळाची गरज बनत आहे. या संदर्भात महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल व कृषी विद्यापीठांचे कुलपती मा. श्री. आचार्य देवव्रत यांचे योगदान अत्यंत मौलिक योगदान लाभत असून त्यांच्या दूरदृष्टीतून आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शना मुळे नैसर्गिक शेतीचा विचार राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची दिशा निश्चित होतं आहे.याच धर्तीवर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला द्वारे ‘नैसर्गिक शेती‘ वर विशेष भर देण्यास सुरुवात झाली असून नैसर्गिक शेतीचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी विद्यापीठाच्या नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे वतीने ‘नैसर्गिक शेती संधी आणि आव्हाने‘ या अतिशय महत्त्वकांक्षी विषयावर एक दिवसीय विचार मंथन सत्राचे आयोजन मंगळवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय कृषिमंत्री म ाननीय नामदार दत्तात्रय भरणे यांचे अध्यक्षतेत कृषि महाविद्यालय अकोलाच्या स्व. के. आर. ठाकरे सभागृहात संपन्न होणाऱ्या या अतिशय परिसंवादाचे प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव कृषी मा.विकासचंद्र रस्तोगी, राज्याचे कृषी आयुक्त मा. सुरज मांढरे यांचे सह मुख्य आयोजक डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीचे कुलगुरू, डॉ. इंद्रमणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय भावे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांचे सहप्रमुख वक्ते पद्मश्री डॉ. हरिओम, राज्य प्रशिक्षण सल्लागार (नैसर्गिक शेती) व निवृत्त प्रधान शास्त्रज्ञ, डॉ. बलजित सिंग सहारण, वरिष्ठ शास्त्रज्ञ, चौ. चरणसिंग हरियाणा कृषी विद्यापीठ, हिसार, तसेच विविध तांत्रिक सत्रांतील विषयतज्ज्ञ, डॉ. वि. जे. पटेल, विभागप्रमुख, कृषीविद्या, आनंद कृषी विद्यापीठ, आनंद, डॉ. स्वप्निल देशमुख, प्राचार्य, नैसर्गिक शेती महाविद्यालय, गुजरात नॅचरल फार्मिंग स्टेट युनिव्हर्सिटी, हलोल, डॉ. एन. व्ही. कुरकुरे, संशोधन संचालक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

तसेच या कार्यशाळेत कृषी आयुक्तालयापासून ते जिल्हा स्तरावरील अधिकारी, आत्माचे प्रकल्प संचालक, विद्यापीठाचे अधिष्ठाता, विस्तार व संशोधन संचालक, विषयतज्ज्ञ शास्त्रज्ञ, विद्यार्थी, जिल्हा कृषी अधीक्षक आणि विविध राष्ट्रीय संशोधन केंद्रांचे संचालक उपस्थित राहणार आहेत.

## थोडक्यात

### मसाला, तेल, तूर डाळीचा भडका

**अकोला :** रमझान ईद, होळी व लग्नसराईच्या तोंडावर शेंगदाणा, तेलापाठोपाठ तूरडाळ व मसाल्यांचे भाव वाढले आहेत. खाद्यतेलांच्या दरातही मोठी वाढ झाली असून, किरकोळ बाजारात सरकी तेल १६० रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

### परीक्षेत गैरप्रकार केल्यास गुन्हा!

**अकोला :** राज्यात दहावी व बारावीच्या परीक्षा पूर्णतः कॉपी मुक्त करण्यासाठी शिक्षण मंडळाने कठोर उपाययोजना जाहीर केल्या आहेत. परीक्षेत गैरप्रकारांसाठी मदत करणाऱ्यांवर थेट अजामीनपात्र गुन्हा नोंद होणार आहे. ८० टक्के परीक्षा केंद्रांवरील वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत.

### युवकाचीगळफास घेऊन आत्महत्या

**आगर :** अकोट फैल पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या उगवा येथील शुभम मनोहर इंगळे (२७) यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी घडली. शुभम इंगळे यांच्या वडिलांचे पूर्वीच निधन झालेले असून, कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर होती. कुटुंबाची मुजरे महमंदपूर येथे सामायिक शेती असून शुभम उगवा येथूनच शेतीची कामे सांभाळत होता. शेतीतून अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने ते काही काळापासून चिंतेत असल्याचे मित्रमंडळी सांगतात. घटनेच्या दिवशी चार वाजताच्या सुमारास मोठा भाऊ घरी परतल्यानंतर ही घटना उघडकीस आली. अकोट फैल पोलिस स्टेशनमध्ये नोंद करण्यात आली.

### आपातापा येथे प्रकट दिन

**आपातापा :** येथील शिव– गजानन महाराज मंदिरात श्री संत गजानन महाराजांचा प्रकट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ७ फेब्रुवारी रोजी तीर्थकलशाची स्थापना करण्यात आली. ८ फेब्रुवारी रोजी पहाटे मंत्रोच्चारात श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. यानंतर ह.भ.प. आत्माराम महाराज वाकोडे यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, शेकडो भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रकट दिनाच्या कार्यक्रम ासाठी मंदिर परिसर आकर्षक सजावटीने उजळून निघाला होता. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन, कीर्तन व महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी योजनासाठी मंदिर विश्वस्त, तसेच ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. ही माहिती शिव– गजानन महाराज मंदिराचे विश्वस्त किरण महाराज बोपटे यांनी दिली.

### जिल्हा ग्रंथोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

# वाचक घडविण्यात ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्वाची : डॉ. प्रतिमा इंगोले

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
वाचक घडविण्यात ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्वाची असून, त्यासाठी चळवळ उभारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार डॉ. प्रतिमा इंगोले यांनी अकोट येथे केले.

जिल्हा ग्रंथोत्सवाचा शुभारंभ अकोट येथे सांस्कृतिक कलाभवनात झाला, त्यावेळी अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. उद्घाटनापूर्वी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. दिंडीचे उद्घाटन व ग्रंथ पूजन अकोट शहराच्या नगराध्यक्ष माया धुळे यांच्या हस्ते झाले.

साहित्यिक नरेंद्र इंगळे, अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे,माजी सभापती दादासाहेब खोटरे आदी उपस्थित होते.शुभारंभाला उपविभागीय



अधिकारी मनोज लोणारकर, मुख्याधिकारी शशिकांत बाबर, सहाय्यक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील, शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य सुरेशदादा खोटरे,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे डॉ. गजानन कोठेवार डॉ. एस आर बाहेती उपस्थित होते.डॉ. इंगोले म्हणाल्या की, लेखक समाजाचे सुख–दु:ख लेखनातून मांडत असतो. साहित्य हा समाजमनाचा आरसा आहे. ग्रंथालयांनी चळवळ उभारून साहित्य घराघरांपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन त्यांनी केले. अनेक मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले. मनोज देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. कलावंत हर्षदा इंदाने यांनी मला जिजाऊ व्हायचं हा एकपात्री प्रयोग सादर केला.

## गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल; अर्ज मागविले

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
माजकल्याण कार्यालयातर्फे गटई काम गारांना १०० टक्के अनुदान तत्वावर तयार पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना राबवली जाते. त्यासाठी २८ फेब्रुवारीपूर्वी अर्ज मागविण्यात आले आहेत.

अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी व अनुसूचित जातीचा असावा. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ग्रामीण भागातील असल्यास ८० हजार व शहरातील असल्यास १ लाखापेक्षा अधिक असू नये. तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक. वय १८ पेक्षा कमी नसावे. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा स्थानिक स्वराज्य संस्थेने त्याला भाड्याने, कराराने, खरेदीने वा विनामूल्य मात्र, अधिकृत ताब्यात दिलेली असावी किंवा त्याच्या स्वयंमालकीची असावी. लाभार्थ्यांचा प्राधान्यक्रम– अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार पीडित झालेली अनुसूचित जातीची व्यक्ती, घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा, परितक्त्या महिला, दिव्यांग व्यक्ती असा असेल.

इच्छूकांनी सहायक आयुक्त समाजकल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, पोलीस वसाहतीजवळ, अकोला येथे अर्ज करावेत.

## जन्म–मृत्यू दाखले देण्याची झोननिहाय सुविधा पूर्ववत करा

### अतिक्रमण निर्मूलन पथके कार्यान्वित करण्याचे महापौर सौ. शारदा खेडकर यांचे निर्देश

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
अकोला महानगरपालिका क्षेत्रात झोननिहाय जन्म–मृत्यू दाखले देण्याची प्रक्रिया काही कारणास्तव बंद करण्यात आली असल्याने नागरिक व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. जन्म–मृत्यूचे दाखले हे अत्यावश्यक शासकीय दस्तऐवज असून शैक्षणिक, वैद्यकीय तसेच विविध शासकीय योजनांसाठी त्यांची तातडीने गरज असते. ही



बाब लक्षात घेता नागरिकांच्या सोयीसाठी झोननिहाय जन्म–मृत्यू दाखले देण्याची सुविधा तात्काळ पूर्ववत सुरू करण्याचे निर्देश महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर यांनी प्रशासनास दिले. तसेच नागरिकांना व विद्यार्थ्यांना जन्म–मृत्यूचे दाखले ठरावीक कालमर्यादेत मिळतील, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.
दरम्यान, शहरातील सार्वजनिक रस्ते, चौक, बाजारपेठा तसेच अनधिकृत बांधकामांमुळे होणाऱ्या अतिक्रमणांमुळे वाहतूक व दैनंदिन रहदारीला अडथळे निर्माण होत आहेत. या अतिक्रमणांवर प्रभावी व वेळेत कारवाई करण्यासाठी महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक झोनमध्ये वाहनांसह स्वतंत्र अतिक्रमण निर्मूलन पथके कार्यान्वित करण्यात यावीत, असे निर्देशही महापौरांनी दिले. या पथकांसाठी आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करून त्यांना वाहन व आवश्यक साहित्य उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून शहरातील अतिक्रमणांवर प्रभावी अंमलबजावणी करता येईल, असा विश्वास महापौर सौ. शारदा रणजीत खेडकर यांनी व्यक्त केला.

## बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी निवडणूक निकाल जाहीर

### अॅड.मोतीसिंग मोहता अध्यक्षपदी विजयी

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
बीजीई सोसायटी संचालित अकोला येथील आर.एल.टी. सायन्स कॉलेज व कारंजा येथील किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय या दोन मतदान केंद्रांवर आज रविवार, ८ फेब्रुवारी रोजी सकाळी मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या मतदान प्रक्रियेत एकूण ३१९ पैकी २६१ मतदार सभासदांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये कारंजा येथील केंद्रावर २८, तर अकोला येथील केंद्रावर २३३ मतदारांनी मतदान केले.

मतदानानंतर अकोला येथील आर. एल.टी. सायन्स कॉलेजच्या सभागृहात सायंकाळी मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. अध्यक्ष पदासाठी म ावळते अध्यक्ष अॅड. मोतीसिंग घनश्याम दाजी मोहता आणि माजी अध्यक्ष डॉ. राजकुमार बालाबकसजी हेडा यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. अखेर झालेल्या मतमोजणीत अॅड. मोतीसिंग मोहता यांनी १४१ मते मिळवत



विजय मिळवला, तर डॉ. आर.बी. हेडा यांना ११८ मते प्राप्त झाली. यासह अॅड. मोतीसिंग मोहता यांची बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला यांच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. दरम्यान, कनिष्ठ उपाध्यक्ष पदासाठी इंजि. अभिजीत गोविंद परांजपे यांनी १४० मते मिळवत विजय मिळवला, तर शरद अभयकुमारजी चवरे यांना ११८ मते मिळाली. सहसचिव पदासाठी अमित अविनाशजी सुरेका यांनी १६३ मते मिळवत विजय संपादन केला, तर डॉ. रविंद्र चंपालालजी जैन यांना ९७ म ते प्राप्त झाली. ज्येष्ठ उपाध्यक्ष विजयकुमार तोष्णीवाल आणि सचिव पवन माहेश्वरी हे दोघेही बिनविरोध निवडून आले.

कार्यकारी समिती सदस्यांच्या निवडणुकीत अॅड. संजय अटल यांनी १८९ मते मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्यानंतर डॉ. अजय कामत (१७९), करण चीमा (१७८), मनोजसिंह बिसेन (१७१), श्रीकृष्ण अमरावतीकर (१६०), राहुल महाजन (१५८), अभय बिजवे (१५३), ललित अग्रवाल (१४५), गोविंद कायडीवाल (१४५), अॅड. सुशील शर्मा (१४४), आनंद चांदक (१४३) व नरेंद्र बाहेती (१४२) यांनी विजय मिळवला.

# किसानांच्या स्थायी कर्जमुक्तीसाठी अकोल्यात राष्ट्रीय किसान चर्चासत्र

### २० व २१ फेब्रुवारीला बार्शीटाकळी येथे देशभरातील तज्ज्ञ, शेतकरी नेते व अर्थतज्ज्ञांची उपस्थिती

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
किसानांना वारंवार कर्जमाफी देण्याऐवजी त्यांना कर्जाच्या चक्रातून कायमची मुक्तता मिळावी, या उद्देशाने खपलेश डशलींळीूं ऋळींीं – ऋरीशीी' थशश्रषरीश चींीं हा मूलमंत्र समोर ठेवून राष्ट्रीय किसान चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे दोन दिवसीय चर्चासत्र शुक्रवार व शनिवार, २० व २१ फेब्रुवारी २०२६ रोजी बार्शीटाकळी तालुक्यातील वेदनंदिनी एग्रो टूरिझम, कान्हेरी सरप (अकोला बायपासपासून ४ कि.मी.) येथे संपन्न होणार आहे. या राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रात देशातील अनुभवी शेतकरी, कृषी तज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत व शेतकरी नेते एकत्र येऊन कृषी, शेतकरी आणि कृषी अर्थव्यवस्थेतील सध्याच्या गंभीर संकटांवर सखोल चर्चा करून ठोस व दीर्घकालीन उपाययोजना मांडणार आहेत. चर्चासत्रास मा. राजेंद्रजी आप्पासाहेब पवार (बारामती कृषी प्रतिष्ठान), नैसर्गिक शेतीचे प्रणेते मा. सुभाष पालेकर (अमरावती), मा. सुनंदाताई राजेंद्र पवार, मा. विठ्ठलराजे पवार (इंदापूर), मा. निर्मलाताई हर्षवर्धन देशमुख (अमरावती), शेतकरी नेते मा. जयंत पाटील (अलीबाग) यांच्यासह अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. यासोबतच अर्थशास्त्रज्ञ मा. विश्वास उटगी, मा. सतीश देशमुख (पुणे), मा. अमर हबीब, मा. अनंत मोहड (वर्धा) तसेच विविध राज्यांतून आलेले तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. हैदराबाद, मेरठ, मुंबई, राजकोट, हिमाचल प्रदेश आदी ठिकाणांहून शेतकरी चळवळीतील प्रतिनिधीही या चर्चासत्रात मार्गदर्शन करणार आहेत. या राष्ट्रीय किसान चर्चासत्राचे आयोजन किसान ब्रिगेड, किसान परिसंघ भारत व भारतीय बहुभाषिक वृत्तपत्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून, राष्ट्रीय अध्यक्ष श्री. प्रकाश गोपालराव पोहरे यांनी देशभरातील शेतकरी, अभ्यासक व नागरिकांनी या चर्चासत्रात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## किरकोळ वादातून नेर येथे एकास मारहाण

तेल्हारा : तालुक्यातील नेर येथे किरकोळ कारणावरून एकास मारहाण केल्याची घटना रविवारी घडली. याप्रकरणी तेल्हारा पोलिसांनी संबंधित किराणा दुकानदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी रामराव शामराव काळणे (४५) यांना गावातीलच किराणा दुकानदार बाळकृष्ण रामकृष्ण म्हस्के या दुकानासमोर जेवायला बसल्याच्या कारणावरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच काठीने डाव्या कानाच्या मागील बाजूस प्रहार करून फिर्यादीस जखमी केले. या घटनेप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून तेल्हारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## अट्टल गोवंश चोर शेख रेहान शेख रशीद एक वर्षाकरीता स्थानबद्ध

■अकोला,दि.९ (प्रतिनिधी)■
अकोला शहरातील पिंजारी गल्ली, कच्छी मस्जीद मागे, मच्छी मार्केट, अकोला येथे राहणारा कुख्यात गुंड व अट्टल गोवंश चोर शेख रेहान शेख रशीद वय २२ वर्ष याचे वर यापुर्वी गोवंश जनावरांची चोरी, कीतीही किमतीची गुरे ढोरे इत्यादींना किंवा पन्नास रुपये किंमतीच्या जनावरास ठार मारून किंवा विकलांग करून आगळीक करणे, अपराध्याला वाचविण्यासाठी गुन्हयाचा पुरावा नाहीसा होण्याची तजवीज करणे किंवा खोटी माहीती देणे, बेकायदेशीर रित्या शस्त्र बाळगणे, हददपार आदेशाचे उल्लंघन करणे असे बरेच गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याचे वर यापुर्वी विवीध कलमान्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती, व त्यास अकोला



जिल्हयातुन हददपार सुध्दा करण्यात आले होते परंतु त्याचे वर त्याचा काहीच परिणाम झालेला नव्हता. तो प्रतिबंधक कार्यवाही करून सुध्दा जुमानत नसल्याने त्याचे विरूध्द गंभीर दखल घेण्यात येवुन कुख्यात गुंड व अट्ठल गोवंश चोर शेख रेहान शेख रशीद, याचे गुन्हेगारी वृत्तीस आळा बसावा याकरीता मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी त्यास स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हादंडाधिकारी, अकोला यांना सादर केला होता. मा. जिल्हादंडाधिकारी, श्रीमती वर्षा मीना यांनी सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून तसेच स्वतःचे स्त्रोताव्दारे म ाहीती मिळवुन सदर कुख्यात गुंड हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्याने त्यास एक वर्षा करीता अकोला जिल्हा कारागृहात स्थानबध्द ठेवण्याबाबतचा आदेश दि. ०८/०२/२०२६ रोजी पारीत केला होता.

मा. जिल्हादंडाधिकारी, सा. अकोला यांचे आदेशावरून शेख रेहान शेख रशीद याचा तात्काळ शोध घेवुन त्यास सदरचा आदेश ताम ील करून त्यास दिनांक ०८/०२/२०२६ रोजी जिल्हा कारागृहात स्थानबध्द केले.

## मळसुर येथे कायमस्वरूपी तलाठी नसल्याने शेतकरी हैराण

### ✻ कायमस्वरूपी तलाठी देण्याची मागणी
### ✻ पोलीस पाटील पद सुद्धा अनेक वर्षांपासून रिक्त

■आलेगाव,दि.९ (प्रतिनिधी)■
पातूर तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने एक मोठे असलेले गाव म्हणून मळसुर गावाची गणना केली जाते,अकोला जिल्ह्यातील सीमेवरील सर्वात शेवटच्या मोठ्या गावांपैकी मळसुर म्हणून परिचित आहे,मात्र गेल्या अनेक महिन्यापासून मळसुर येथील तलाठी पद हे रिक्त असून त्या पदाचा अतिरिक्त कारभार हा इतर गावातील तलाठी यांचेकडे असल्याने गावातील शेतकऱ्यांच्या कामात अडचणी येत असून हैराण झाले.

मळसुर येथे कायमस्वरूपी व पूर्णवेळ तलाठी द्यावा अशी म ागणी मळसुर गावकऱ्यांनी केली आहे.यावर्षी पातूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, मध्यंतरी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती मधील अनुदानाबाबत अनेक अडचणी

**१ मळसुर हे अकोला जिल्ह्याच्या सीमेवरील महत्वाचे व मोठे गाव आहे,येथे कायम स्वरूपी व पूर्णवेळ तलाठी यांची नियुक्ती करावी जणेकरून शेतकऱ्यांची कामं व्यवस्थित होतील तसेच खूप वर्षांपासून रिक्त असलेले पोलीस पाटील पद भरण्यात यावे अशी मागणी केली आहे. –विनोद राऊत,जिल्हा समन्वयक**

निर्माण झाल्या होत्या,तसेच,ई पीक पाहणी,महा डीबीटी अनुदान,इतर शेतीसंदर्भातील कामकाजाच्या बाबत शेतकऱ्यांना कायमस्वरूपी तलाठी नसल्याने खूप अडचणी येत आहेत.

त्यामुळे,शेतकऱ्यांची मोठी तारांबळ उडत असून, येथे पूर्णवेळ व कायम स्वरूपी तलाठी यांची नियुक्ती करावी जणेकरून शेतकऱ्यांना विनाकारण त्रास सहन करावा लागणार नाही. सद्यस्थितीत मळसुर तलाठी पदाचा अतिरिक्त पदभार हा श्री ठाकरे यांचेकडे दिला आहे, ठाकरे यांचेकडे अगोदरच दुसरे गावं असल्याने त्यांना मळसुर येथे जास्त वेळ देता येत नाही,त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसंदर्भात व शासकीय योजनांच्या कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत.

तसेच मळसुर येथे बऱ्याच वर्षांपासून पोलीस पाटील पद सुद्धा रिक्त असल्याचे समजते त्यामुळे लवकरात लवकर तलाठी तसेच पोलीस पाटील पद भरावे अशी गावकऱ्यांनी मागणी केली आहे.

## भव्य प्रबोधनात्मक बुद्ध भिम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन

■पातुर,दि.९ (प्रतिनिधी)■
दरवर्षी प्रमाणे यावर्षीही बु. गोवर्धनजी पोहरे बहुउद्धेशीय शिक्षण व क्रीडा प्रसारक मंडळ पातूर र. न. एफ. ९३५९ भिमा कोरेगाव शौर्य दिन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त भव्य प्रबोधनात्मक बुद्ध भिम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन पातूर शहरात करण्यात आले आहे. निर्भयभाऊ



पोहरे मित्रपरिवार, पातूरच्या वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक मराठी इंडियन आयडॉल संतोष जोंधळे यांचा भिमा कोरेगाव शौर्य दिन तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य प्रबोधनात्मक बुद्ध भिम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता नगर परिषद खेळाचे नियोजीत मैदान,पातूर येथे करण्यात आले असून शहरासह तालुक्यातील ग्रामस्थांनी या बुद्ध भिम गीतांच्या कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

असे आवाहन निर्भय पोहरे,स्वप्निल सुरवाडे,प्रवीण पोहरे,मंगेश गवई, निहार घुगे,धीरज खंडारे,रवी उपर्वट, विकास सरदार व निर्भयभाऊ पोहरे मित्र परिवाराच्या सर्व सदस्यांनी केले आहे.



## स्विगी आणि रॉबिन हूड आर्मी यांचा विंटर वंडरलँड उपक्रम: महाराष्ट्रात ३३० हून अधिक जेवणांचे वितरण



**अमरावती, ९ फेब्रुवारी :** भारताचा अग्रगण्य ऑन-डिमांड सुविधा प्लॅटफॉर्म स्विगी (एनएसई: स्विगी / बीएसई: ५४४२८५) यांनी रॉबिन हूड आर्मी (आरएचए) यांच्या सहकार्याने विंटर वंडरलँड हा हृदयस्पर्शी हिवाळी उपक्रम राबवला. या उपक्रमाचा उद्देश भारतभरातील वंचित घटकांपर्यंत ऊब, काळजी आणि पोषण पोहोचवणे हा होता. कडाक्याच्या हिवाळ्यात अत्यंत गरजू व्यक्ती व कुटुंबांना ताजे तयार केलेले जेवण देण्यावर या मोहिमेचा भर होता. हा उपक्रम भारतातील १४ राज्यांमधील ५६ शहरांमध्ये राबवण्यात आला.

हिवाळ्यात तापमान घसरत असताना, स्विगी आणि रॉबिन हूड आर्मी यांनी अमरावती, परभणी, इचलकरंजी, गोंदिया आदी ठिकाणी उघड्या झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना, अनाथाश्रमातील रहिवाशांना, रस्त्यावर राहणाऱ्या व्यक्तींना तसेच इतर वंचित समुदायांना पुरी, भाजी आणि मिठाई असे ३३० ताजे तयार केलेले जेवण वितरित केले. स्विगीच्या सहकार्यामुळे रॉबिन हूड आर्मीच्या स्वयंसेवकांना सणासुदीच्या काळात एकाच वेळी अनेक शहरांमध्ये जेवण वितरणाचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे शक्य झाले.

या उपक्रमाबाबत बोलताना स्विगी फूड मार्केटप्लेसचे मुख्य व्यवसाय अधिकारी सिद्धार्थ भाकू म्हणाले, स्विगीमध्ये आम्ही आमची देशभरातील उपस्थिती, व्यापक व्याप्ती आणि संसाधनांचा वापर करून नेहमीच आनंद आणि मदत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. रॉबिन हूड आर्मीच्या भागीदारीत राबवलेला विंटर वंडरलँड हा हिवाळ्याच्या कठीण काळात गरजू लोकांपर्यंत गरम व ताजे जेवण पोहोचवण्याच्या दिशेने उचललेले आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

याच उपक्रमाविषयी रॉबिन हूड आर्मीच्या राष्ट्रीय सोशल मीडिया प्रतिनिधी वसुंधरा भंडारी म्हणाल्या, स्विगीसोबतचा विंटर वंडरलँड हा उपक्रम संस्थांनी आणि समाजाने एकत्र येऊन काम केल्यास करुणा किती पटीने वाढू शकते याची जाणीव करून देणारा ठरला. या उपक्रमामुळे विविध शहरांमधील हजारो मुले आणि वंचित व्यक्तींना केवळ जेवणच नाही, तर ऊब, काळजी आणि आपुलकीची भावना देखील मिळाली.

हा उपक्रम भूक दूर करण्यासाठी आणि अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या समुदायांपर्यंत पोहोचण्यासाठी स्विगी आणि रॉबिन हूड आर्मी यांच्या सामायिक बांधिलकीचे प्रतीक आहे. गेल्या एका महिन्यात विंटर वंडरलँड उपक्रमाअंतर्गत विविध शहरांमध्ये एकूण ५,५५० ताजे तयार केलेले जेवण वितरित करण्यात आले आहे.

# अदाणी इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयआरआयएस राष्ट्रीय मेळाव्याचे आयोजन

**अहमदाबाद, ९ फेब्रुवारी :** अदाणी इंटरनॅशनल स्कूल (एडीआयएस), शांतिग्राम यांनी ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान आयआरआयएस राष्ट्रीय मेळावा २०२५२६ (कोहोर्ट २) आयोजित केला. या उपक्रमामुळे अहमदाबादला शालेय स्तरावरील विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (स्टेम) क्षेत्रातील संशोधन व नवोपक्रमासाठी राष्ट्रीय व्यासपीठ मिळाले.

रविवारी संपलेल्या या तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यक्रमात १२ राज्ये आणि २४ शहरांतील ७५ विद्यार्थी नवोन्मेषकांसह शिक्षक, संशोधक आणि मार्गदर्शक सहभागी झाले. वर्गखोल्या आणि पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन शिक्षण देण्याच्या उद्देशाने आयोजित या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रदर्शनांसोबत संरचित मार्गदर्शन, परिसंवाद आणि सार्वजनिक सहभाग यांचा समावेश होता.

समारोप समारंभाला संबोधित करताना गुजरात सरकारच्या शिक्षण राज्यमंत्री मा.सौ.रिवाबा रविंद्रसिंह जडेजा यांनी शिक्षणाच्या प्रवासात सुरुवातीपासूनच संशोधन आणि नवोपक्रम रुजविण्याची गरज अधोरेखित केली.

त्या म्हणाल्या, संशोधन आता केवळ विद्यापीठांच्या प्रयोगशाळांपुरते मर्यादित राहिलेले नाही. ते अदाणी इंटरनॅशनल स्कूलसारख्या संस्थांपासूनच सुरू होते. विद्यार्थी लवकर प्रश्न विचारू लागतात, कल्पनांची चाचणी घेतात आणि अपयशातून शिकतात, तेव्हा त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाची पायाभरणी होते. त्यामुळे शाळा या केवळ शिक्षण देणाऱ्या संस्था नसून कल्पना आणि उपाययोजनांचे संवर्धन करणाऱ्या केंद्रांमध्ये रूपांतरित व्हायला हव्यात.





कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य आणि शिक्षक परिषदेने झाली, ज्यामध्ये अहमदाबादमधील विविध शाळांचे प्रमुख सहभागी झाले आणि शोधाधारित स्टेम अध्यापन व अनुभवाधारित वर्गपद्धती मजबूत करण्यावर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांच्या मूल्यमापन व मार्गदर्शनासह निवडक प्रदर्शनांद्वारे आपले मौलिक संशोधन सादर केले.

समारोप समारंभाला सौ. नम्रता अदाणी तसेच अदाणी समूहाच्या आंतरराष्ट्रीय ऊर्जा व्यवसायाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अमित सिंह यांसह अनेक वरिष्ठ लीडर्स उपस्थित होते.

आयआरआयएस राष्ट्रीय मेळाव्याचे आयोजन करून एडीआयएस ने अहमदाबाद आणि गुजरातमध्ये सर्वांगीण शिक्षणासाठी वचनबद्ध असलेल्या संस्थेची आपली ओळख अधिक दृढ केली. शाळेने शैक्षणिक काटेकोरपणासोबत स्टेम संशोधन, जागतिक स्पर्धा, क्रीडा, कला आणि नेतृत्व विकास यांसारख्या सहशालेय व अभ्यासेतर क्षेत्रांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे, ज्यामुळे राज्याच्या विकसित होत असलेल्या शैक्षणिक परिसंस्थेला हातभार लागला आहे.

आयआरआयएस राष्ट्रीय मेळावा २०२ २६ चा यशस्वी समारोप शाळा या प्रारंभिक संशोधन, सहकार्य आणि नवोपक्रमासाठी उत्प्रेरक ठरत असल्याचे अधोरेखित करतो, ज्यामुळे भारतातील पुढील पिढीतील वैज्ञानिक विचारवंतांची भक्कम पायाभरणी होत आहे.

आयआरआयएस कार्यक्रम हा एक्स्टेम्पलर एज्युकेशन लिंकर्स फाउंडेशन यांचा उपक्रम असून, तो भारतभरातील तरुण नवोन्मेषकांमध्ये वैज्ञानिक संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे. इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देत देशाचे प्रतिनिधित्व आयएसईएफ मध्ये करण्याचे मार्ग उपलब्ध करून देतो.

## अदाणी एनर्जी सोल्यूशन्सकडून ६,००० मेगावॅट क्षमतेच्या एकात्मिक ग्रीन एनर्जी कॉरिडॉरद्वारे भारताच्या हरित ऊर्जा पायाभूत सुविधांना बळकटी

**अहमदाबाद, ९ फेब्रुवारी :** भारतातील सर्वात मोठी खाजगी ऊर्जा सेवा कंपनी असलेल्या अदाणी एनर्जी सोल्यूशन्स लिमिटेड (एईएसएल)यांनी त्यांच्या प्रमुख हाय-व्होल्टेज डायरेक्ट करंट (एचव्हीडीसी) ट्रान्समिशन प्रकल्पासाठी जपानी बँकांच्या समूहाकडून दीर्घकालीन वित्तपुरवठा सुनिश्चित केला आहे.हा प्रकल्प उत्तर भारतात अक्षय ऊर्जेचा पुरवठा मजबूत करण्यासाठी ग्रीन इव्हॅक्युएशन कॉरिडॉर म्हणून विकसित केला जात आहे.

हा प्रकल्प राजस्थानमधील सौरऊर्जेने समृद्ध प्रदेशांमधून अक्षय ऊर्जा बाहेर काढून ती भारताच्या राष्ट्रीय वीज ग्रीडमध्ये पोहोचवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल, ज्यामुळे देशातील स्वच्छ ऊर्जेची वाढती मागणी पूर्ण होण्यास मदत होईल.

औ८०० केव्ही क्षमतेच्या उच्च क्षमतेच्या एचव्हीडीसी नेटवर्क स्वरूपात विकसित करण्यात आलेला हा ६,००० मेगावॅट क्षमतेचा आणि सुमारे ९५० किलोमीटर लांबीचा कॉरिडॉर राजस्थानमधील भाडला ते उत्तर प्रदेशातील फतेहपूर यांना जोडणार आहे. २०२९ पर्यंत कार्यान्वित होण्याचे नियोजन असलेला हा दुवा मोठ्या प्रमाणात अक्षय ऊर्जेचे एकत्रीकरण सक्षम करताना आणि देशातील प्रमुख शहरी व औद्योगिक केंद्रांसाठी ग्रीडची स्थिरता वाढवताना एक महत्त्वाची हरित ट्रान्समिशन धमन्यासारखी भूमिका बजावेल.

हा मालमत्ता प्रकल्प अदाणी समूहाच्या एकात्मिक स्वच्छ ऊर्जा प्लॅटफॉर्मचा भाग आहे. राजस्थान हे अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल) साठी महत्त्वाचे उत्पादन केंद्र असून, त्यांच्या प्रकल्पांमधून आधीच एईएसएल ची उपकंपनी अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) यांना स्वच्छ वीज पुरवली जाते. एईएमएल सध्या त्यांच्या वीजपुरवठा मिश्रणात ४०% पेक्षा जास्त अक्षय ऊर्जा समाविष्ट करते, ज्यामुळे मुंबई जगातील मोठ्या शहरांपैकी एक म्हणून शाश्वत ऊर्जेच्या मोठ्या प्रमाणातील वापरात आघाडीवर आहे.

हा वित्तपुरवठा जपानी बँकिंग भागीदार एमयूएफजी बँक लिमिटेड आणि सुमितोमो मित्सुई बँकिंग कॉर्पोरेशन (एसएमबीसी) यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला असून, भारताच्या अक्षय ऊर्जा पायाभूत सुविधांवरील आंतरराष्ट्रीय विश्वास अधोरेखित करतो. या प्रकल्पासाठी हिटाची कंपनीकडून अत्याधुनिक एचव्हीडीसी तंत्रज्ञान पुरवण्यात येत असून भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) सोबतच्या सहकार्याद्वारे भारताच्या देशांतर्गत उत्पादन क्षमतेचा लाभ घेतला जात आहे. या भागीदारीमुळे महत्त्वाच्या ट्रान्समिशन तंत्रज्ञानामध्ये जपानचे नेतृत्व आणि मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत भारताच्या स्थानिक उत्पादनवाढीच्या प्रयत्नांना चालना मिळत आहे.

## जनराली सेंट्रल लाईफ़ इन्श्युरन्सद्वारे हिअर नाऊ राष्ट्रीय मोहिमेचा विस्तार

**नागपूर, ९ फेब्रुवारी :** जनराली सेंट्रल लाईफ़ इन्श्युरन्स (जीसीएलआय) ने आपल्या हिअर नाऊ या राष्ट्रीय मोहिमेचा पुढील फ़ेजची सुरवात करायचे जाहिर केले असून, या दुसऱ्या भागामध्ये आयुर्विमाचे लक्ष्य हे आयुष्यातील दोन महत्वाचा टप्प्यांवरती केंद्रित असेल एक म्हणजे मुलांचा भविष्यातील महत्वाकांक्षा आणि निवृत्तीनंतरची सुरक्षितता.

कंपनीची नवीन ओळख आणि सेंट्रल बँक ऑफ़ इंडियासह मध्ये भागीदारी करून, या मोहिमेची सुरवात करण्यात आली, या मोहिमेचा माध्यमाने ब्रॅन्डची वैयक्तिकस्तरावर ग्राहकांना आणि त्यांचा कुटुंबियांना वर्तमान मजबूत आणि सुरक्षित भविष्याकरीता माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेऊन सबळ करण्याप्रती असलेली कट्टीबद्धता सिद्ध होते.एक सच्चा आयुर्विमा भागीदार म्हणून, ब्रॅन्ड ग्राहकांचा आयुष्यातील प्रत्येक स्तरामध्ये त्यांचासह उभा राहातो, मग ते आपल्या मुलांचा स्वप्न पूर्तीकरीता नियोजन करत असो किंवा आपल्या निवृत्तीचा सुरक्षिततेचे, ब्रॅन्ड ग्राहकांची काळजी घेण्याचे आणि त्यांचा आर्थिक प्रवासामध्ये त्यांना सहाय्य करण्याचे वचन देतो.

या लॉन्चचा वेळी बोलताना, जनराली सेंट्रल लाईफ़ इन्श्युरन्सचे, एमडी आणि सीईओ, अलोक रूंगठा म्हणाले, जेएफएम हा भारतातील आर्थिक निर्णय घेण्याकरीताचा एक महत्वाचा कालावधी असतो, विशेषत: आयुर्विमाकरीता, जेंव्हा ग्राहक सक्रिय पद्धतीने वर्षभरातील पुढील काळाकरीता आपल्या प्राधान्यांचे मूल्यांकन करतात. या वेळेला, लहान मुलांचा भविष्याचे नियोजन आणि निवृत्तीनंतरची सुरक्षितता अधिक महत्वाची ठरते. या उपक्रमाचा माध्यमाने, आम्ही लोकांना आयुर्विमा हे एक संरक्षण नव्हे तर त्यांचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन असल्याचे समजावून सांगणार आहो-मग ते मुलांचा महत्वाकांक्षांसंबंधित असो किंवा स्वत:चा भविष्याची आत्मविश्वासाने तर्तुद करणे असो. जनरालीची जागतिक दर्जाची निपुणता आणि सेंट्रल बँक ऑफ़ इंडियावर वर्षानूवर्षे ग्राहकांचा असणारा विश्वास या दोन्हीमुळे ग्राहकांचे सबळीकरण होणार आहे जेणे करून त्यांना एक माहितीपूर्ण, योग्य वेळी आणि आत्मविश्वासाने आर्थिक निर्णय घेता येणार आहे-ज्या निर्णयांमुळे त्यांना आपल्या दीर्घकालीन महत्वाकांक्षा पूर्ण करता येऊ शकतील.


## चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

क्रमांक :- चंशमनपा/पापुवि/२०२६/५०१७ दिनांक :- ०९/०२/२०२६

### निविदा सुचना

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर या निविदेनुसार सक्षम वर्गात पंजीबध्द कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता मोहरबंद टक्केवारी दराने निविदा मागविण्यात येत आहे

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदेसोबत भरावयाची इसारा रक्कम | निविदा प्रपत्र किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | बाबुपेठ संपवेल मधील भुमीगत विद्युत केबल स्थानांतरीत करण्याचे काम | रु. ८,९५,४८३/- | रु. ८,९५०/- | रु. ५९०/- |

अटी -

१. कोरे निविदा फॉर्म मिळण्याची अंतिम तारीख १८/०२/२०२६ ला दु. ३.०० वाजेपर्यंत भरलेली निविदा फॉर्म सादर करावयाची अंतिम तारीख १८/०२/ २०२६ ला दु. ४.०० वाजेपर्यंत

२. कोरे निविदा फॉर्म मिळण्याचे व भरलेले निविदा फॉर्म सादर करण्याचे ठिकाण - आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर.

३. निविदा शक्य झाल्यास सादर करावयाच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी सक्षम उघडण्यात येईल.

४. निविदा दोन लिफाफा पध्दतीव्दारे त्यातील एकामध्ये निविदा भरण्यास पात्र असल्याचे कागदपत्र (नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी. प्रमाणपत्र, पॅन कार्ड, ईपीएफ प्रमाणपत्र) आणि दुसऱ्यामध्ये फक्त कोटेशन फार्म दर नमुद करुन सादर करावे.

५. सदर काम अत्यावश्यक सेवेचे असल्यामुळे पाईपलाईनचे जोडण्याचे काम कार्यादेश प्राप्त होताच ४८ तासाचे आत करणे बंधनकारक राहील.

६. निविदा स्विकारणे अथवा कोणतीही किंवा सर्वच निविदा रद्द करण्याचे अधिकार चंद्रपूर शहर महानगरपालिकेकडे सुरक्षित आहे

७. निविदेसंबंधी सविस्तर माहिती/अटीशर्ती करीता पाणी पुरवठा विभागात संपर्क साधावा

८. कोरे निविदा फॉर्म पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाही.

९. कामासाठी लागणारे कोणतेही मटेरीअल मनपा पुरविणार नाही.

१०. अनामत रक्कम रोखीने भरावयाची असल्यास दि. १८/०२/२०२६ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत भरता येईल.

अतिरिक्त आयुक्त,
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर


# मनफत्तर्फे मारुती सुझुकी प्रस्तुत २४वे झी सिने ॲवॉर्ड्स २०२६ ची घोषणा

**मुंबई, ९ फेब्रुवारी :** भारतातील अग्रगण्य कंटेंट आणि टेक्नॉलॉजी पॉवरहाऊस 'Z' ने देशाच्या मनोरंजन विश्वाला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली असून, कथाकथनाच्या आणि त्या अनुभवण्याच्या पद्धतींना सातत्याने नवे रूप दिले आहे. संस्कृतीत रुजलेल्या आणि भविष्यासाठी सज्ज अशा भावनिकदृष्ट्या प्रभावी कथाकथनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत, विभिन्न स्क्रीन्स, स्वरूपे आणि भाषांमधून समृद्ध व अनुभवात्मक मनोरंजन घडवण्यावर कंपनीचा भर आहे. अनेक दशकांच्या कथाकथनाच्या अनुभवाच्या जोरावर हे नेटवर्क विविध प्लॅटफॉर्म्सवर प्रेक्षकांशी असलेला संवाद सातत्याने अधिक विकसित करत असून प्रेक्षकांशी अधिक खोल आणि अर्थपूर्ण नाते निर्माण करत आहे.

या परंपरेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणून झी सिने ॲवॉर्ड्सचा यात समावेश होतो, जो हिंदी चित्रपटसृष्टीतील उत्कृष्टतेचा गौरव करणारे विश्वासार्ह आणि मानाचे व्यासपीठ म्हणून ओळखले जाते. वर्षानुवर्षे हा सोहळा केवळ उद्योगातील यशाचेच नव्हे, तर चित्रपट आणि प्रेक्षकांमधील दृढ नात्याचेही प्रतिबिंब ठरला असून, सिनेमाचे खरे शिलेदार म्हणून चाहत्यांना मान्यता देणारा हा एक अत्यंत लोकप्रिय उत्सव बनला आहे.

यावर्षी 'Z' आपली प्रेक्षकांना प्रथम ठेवणारी फॅन्टर्टेनमेंट ही संकल्पना यह पल है फॅन्स का या पुढील टप्प्यासह एका नवीन उंचीवर घेऊन जात आहे. चाहत्यांच्या प्रेम, निष्ठा आणि उत्कटतेतूनच सिनेमातील सर्वांत अविस्मरणीय क्षण घडतात या विश्वासाला ही संकल्पना अधिक बळ देते. मारुती सुझुकी प्रस्तुत २४वे झी सिने ॲवॉर्ड्स २०२६ या सत्याचा उत्सव साजरा करत, कलाकार आणि त्यांच्या सर्वांत मोठ्या चाहत्यांमध्ये प्रत्येक क्षण सामायिक अनुभव बनवत आहेत.

मुंबईत झालेल्या उत्साही आणि चाहत्यांच्या सहभागातून साकारलेल्या पत्रकार परिषदेत २०२६ आवृत्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली. या वेळी बॉलिवूड सुपरस्टार्स अक्षय कुमार, तमन्ना भाटिया, जॅकलिन फर्नांडिस, सोनम बाजवा, अपारशक्ती खुराणा, मिथून आणि पलक मुच्छल यांनी एक येऊन या रोमांचक नव्या पर्वाची सुरुवात केली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला आपुलकी, स्टार पॉवर आणि प्रेक्षकांशी जोडलेपणाची भावना लाभली, ज्यामुळे चाहत्यांच्या नजरेतून सिनेमा साजरा करणाऱ्या या पर्वाची दिशा ठरली. ही घोषणा केवळ पाहण्याचा क्षण न राहता, चाहत्यांनी स्वतः





घडवलेला एक अनुभव ठरला आणि त्यामुळे चाहते केवळ साक्षीदार न बनता त्या क्षणांचे खरे शिल्पकार बनले.

कार्यक्रमाची ऊर्जा वाढत गेली जेव्हा अभिनेत्री तमन्ना भाटिया, जॅकलिन फर्नांडिस, सोनम बाजवा आणि अभिनेता अपारशक्ती खुराणा यांच्यासोबत संगीतकार मिथून आणि गायिका पलक मुच्छल यांनी मंचावर प्रवेश केला. त्यांनी चाहत्यांशी संवाद साधत, लोकप्रिय हुक स्टेप्स पुन्हा साकारत आणि उत्साही, परस्परसंवादी क्षणांमध्ये सहभाग घेतला. मस्त गप्पा आणि उत्स्फूर्त सादरीकरणांमुळे ह्या संपूर्ण संध्येमध्ये चाहत्यांचा सहभाग केंद्रस्थानी राहिला. सादरीकरणे, संवाद आणि सामायिक उत्साह यांचा सुरेख संगम साधत कलाकार आणि प्रेक्षकांमधील अनोख्या नात्याचा उत्सव साजरा झाला आणि प्रत्येक क्षण खरोखरीच अविस्मरणीय ठरला.


## मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| १ ४ ५ ८ | ४ ७ ८ ९ |
| १०० १४९ ६९० १२५ | ११२ ११५ १८९ १२६ |
| २९० २४८ ७८० २७९ | २२० ४४९ ३७८ ५६८ |
| ३८० ३४७ ५०० ३७८ | ३३८ ५६६ २२४ ३६० |
| जोडी | जोडी |
| १० - ४० - ५७ - ८७ | ४३ - ७३ - ८१ - ९१ |
| १६ - ४६ - ५९ - ८९ | ४६ - ७६ - ८५ - ९५ |
| १२ - ४२ - ५३ - ८३ | ४० - ७० - ८२ - ९२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १० फेबुवारी २०२६

## मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६

**सर्व बाजार साठी**

३१ - ६१ - ९२ - ०२
३५ - ६५ - ९४ - ०४
३७ - ६७ - ८७ - ०८
--------------------
१४८ - ७९० - १९९ - २३५
३४६ - २४० - २८९ - ३७०
३०० - ३३० - ३७९ - ४६०

सर्व बाजारासाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९० | | ६६० | | ४०० | | ४७८ | | ८९० | | ३५७ | |
| २८० | ० | २०० | २ | ६९९ | ४ | ५५९ | ९ | १६० | ७ | ४५६ | ५ |
| ३७० | | ३९० | | २६६ | | ९०० | | २५० | | ५०० | |

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४६ | | १६८ | | २६९ | | २४६ | | १४९ | | १७८ | |
| ४९० | ३ | ३४८ | ५ | ४५८ | ७ | ६७९ | २ | २५७ | ४ | २४० | ६ |
| ५८० | | ७८० | | १८८ | | ४९९ | | ७८९ | | ३६७ | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
० २ ४ ६ ८

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** व्यवसायिकांसाठी दिवस व्यस्त असेल, परंतु आर्थिक परतावा चांगला मिळेल. घरात एखाद्या शुभ प्रसंगाबद्दल चर्चा होऊ शकते, ज्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. जोडीदारासोबतचा जुना वाद मिटेल.

**वृषभ :** आज आध्यात्मिक आणि मानसिक शांती मिळेल. धार्मिक कार्यांमध्ये तुमची रुची वाढेल आणि तुम्ही काही धमार्दाय कार्यात सहभागी होऊ शकता. कामावर, तुमच्या कष्टाचे फळ मिळेल आणि तुमची आर्थिक स्थिती सुधारेल.

**मिथुन :** तुमच्या जोडीदारासोबतचे तुमचे नाते अधिक गोड होईल. प्रेमी आज भेटवस्तूंची देवाणघेवाण करतील, ज्यामुळे त्यांचे प्रेम द्विगुणित होईल. लोखंड व्यवसायात असलेल्यांना आज लक्षणीय नफा मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** दीर्घकाळापासून असलेल्या समस्या सुटतील आणि तुम्हाला मानसिक दिलासा मिळेल. आर्थिक नफ्यासाठी तुम्हाला अनेक संधी मिळतील आणि तुमच्या व्यवसायात वाढ होईल. कौटुंबिक जीवन आनंदी असेल.

**सिंह :** तुम्हाला कुटुंबातील ज्येष्ठांकडून पाठबळ मिळेल आणि घरात शांतता टिकून राहील. जर तुम्ही लेखन किंवा कला क्षेत्रात कार्यरत असाल, तर तुमची लोकप्रियता वाढेल. परदेश प्रवासाचे संकेत आहेत.

**कन्या :** नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाजयांसाठी आजचा दिवस खूप चांगला आहे. आज तुम्ही जे काही हाती घ्याल ते नक्कीच यशस्वी होईल. नोकरी करणाजयांना आज मोठा प्रोजेक्ट मिळेल, भविष्यात फायदा होईल.

**तुळ :** आरोग्याच्या बाबतीत, पायाच्या वेदनेबद्दल सावधगिरी बाळगा. नियमित व्यायाम करणे आणि पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे.

**वृश्चिक :** तुम्ही नवीन घर किंवा वाहन खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर हा दिवस अनुकूल आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षांमध्ये यश मिळेल. तुमचे आरोग्य सुधारेल, जुन्या आजारांपासून आराम मिळेल.


**धनु :** आरोग्याच्या दृष्टीने, तुम्हाला पूर्वीपेक्षा अधिक ऊर्जावान वाटेल. आज तुम्ही तुमच्या कुटुंबासोबत आणि मित्रांसोबत आनंदी आणि प्रसन्न वेळ घालवाल. आज अनावश्यक वाद टाळा.

**मकर :** वास्तुशास्त्र क्षेत्रातील लोकांसाठी आजचा दिवस प्रगतीचा असेल. शेतकजयांना आज काही फायदा होण्याची शक्यता आहे. त्यांना त्यांच्या पिकांच्या विक्रीसाठी जमीनदाराकडून इच्छित रक्कम मिळू शकते.

**कुंभ :** आज लोक तुमच्यावर विश्वास ठेवतील. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाजया विद्यार्थ्यांसाठी हा काळ अनुकूल आहे. तुमच्या धाकट्या भावाकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**मीन :** आज तुम्हाला तुमच्या करिअरकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे, कारण नवीन संधी तुमची वाट पाहत आहेत. कार्यालयात तुमच्या कामाचे कौतुक होईल आणि बढतीचीही शक्यता आहे.

## शब्दकोडे क्रमांक २३४९



**उभे शब्द :-**

१) चर्चा
२) अंदाज, अटकळ
३) बिना फोडणीची आमटी
४) दुर्दशा
५) उत्तराधिकारी
६) दृष्टीभेट
७)उगाच
८) नाकावरील मोत्याचा दागिना
११) सुकुमार, एक प्रकारचा स्वादिष्ट तांदूळ
१३) नमस्काराचा एक प्रकार
१४) लोखंड घासण्याचे एक हत्यार
१५) वेळ घालविणे
१७) निरुपयोगी, नोकरी नसलेला
२१)चांगले
२३) नक्र, सुसर
२५) च्या साठी
२६) सुगंधी पांढरे फूल
२७) स्वच्छ
२९) अटीची भाषा
३०) तारुण्यापूर्वीची अवस्था
३१) सूट
३२) धपाटा
३३) टिंगल, चेष्टा
३६) प्राण
३७) संध्याकाळ
३८)उपवन
४०) कालपुरुष
४१) फिकीर,काळजी
४३) पोपट
४४) शेवट, नाश
४५) लेखणी
४७) टिकून राहणे
४८) दंडकर्ता, नियमकर्ता
५०) संगीतातील एक राग
५२) मदतनीस
५५) नदीवर घातलेला बांध
५७) लेखणीतील रंगीत द्रव पदार्थ
५८) रस्ता, पथ
५९) तृण
६०) धातूचा धागा
६१) ताकद
६२) समाजातील प्रतिष्ठा.

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**

१) मोठा उत्सव
४) नशिबवान
७) आर्जव
९) सरळ लांब वासा
१०) जिव्हा
१२) चंद्र
१३) हुक्की, लहर
१४) बैलाच्या गळ्यात बांधण्याची रस्सी
१५) लाकूड
१६) घोड्याचे घर
१८) बुटका, बटु
१९) पोलिस
२०) कामचुकार (हिं)
२२) मनाचा झालेला ग्रह
२४) हात
२६) लांडोरचा पती
२८) नड
३०) गांधारीचे शतपुत्र
३१) किरकोळ सामान
३४) आसक्त, रमणारा
३५) कमळ
३७) सापाने सोडलेली त्वचा
३९) वर्तुळ, गोलाकार
४२) जमीन भाजण्याचे टहाळे (डहाळी)
४४) शरीर
४६) जळफळाट, अरेरावी
४९) प्रजा, जनता
५१) फोडातील द्रव
५३) संताप, क्रोध
५४) च्या सह, च्या बरोबर
५६) सम्राट, मोठा राजा
५७) भाजी
५८) घोंगड्या विणणारी जमात
६०) मोठी बहीण
६२) नारळाचे झाड
६३) माराची तात्पुरती उमटलेली खूण
६४) हुबेहूब सोंगे वठविणारा
६५) जाणता अजाणता

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

